आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

५ नोव्हेंबर २1०२४ - मंगळवार

**ठळक बातम्या**

- राज्यात विधानसभा निवडणुकीसाठी ४ हजार १४० उमेदवार रिंगणात, विविध राजकीय नेत्यांच्या प्रचारसभांना आजपासून सुरुवात
- शरद पवार यांचे सक्रीय राजकारणातून निवृत्तीचे संकेत
- राज्याच्या पोलीस महासंचालक पदावर संजय वर्मा यांची नियुक्ती

**आणि**

- कार्तिकी एकादशीनिमित्त पंढरपूरचं विठ्ठल मंदिर आजपासून दर्शनासाठी २४ तास खुलं राहणार

<><><><><>

महाराष्ट्रात २० नोव्हेंबरला होणाऱ्या विधानसभा निवडणुकीसाठीचं चित्र स्पष्ट झालं आहे. विधानसभा निवडणुकीसाठी ४ हजार १४० उमेदवार रिंगणात आहेत. राज्यातल्या २८८ मतदारसंघात ७ हजार ७८ उमेदवारांचे अर्ज वैध ठरले होते; उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या कालच्या शेवटच्या दिवसापर्यंत २ हजार ९३८ उमेदवारांनी अर्ज मागे घेतले. अनेक मतदार संघातली बंडखोरी रोखण्यात महायुती आणि महाविकास आघाडीला यश आलं आहे; त्याचवेळी अनेक ठिकाणी बंडखोर उमेदवारांनी आपले अर्ज कायम ठेवल्याने तिथे चुरस निर्माण होण्याची शक्यता आहे. काही ठिकाणी मित्रपक्षांचे उमेदवार अपक्ष म्हणून निवडणूक लढवत असल्याने प्रचाराच्या बाबतीत संभ्रमाचं वातावरण निर्माण झालं आहे.

भाजप नेते आणि राज्याचे उपमुख्यमंत्री आणि दक्षिण पश्चिम नागपूरचे उमेदवार देवेंद्र फडणवीस यांनी आज प्रचाराचा नारळ फोडला. त्यांनी आज जनसंपर्क रॅलीच्या मध्यमातून पेट्रोल पंप चौक हिंगणा नाका इथून प्रचाराला सुरवात केली.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांची सभा आज यवतमाळ जिल्ह्यातील वणी आणि राळेगाव मतदारसंघातील उमेदवारांसाठी होणार आहे.

<><><><><>

विविध राजकीय नेत्यांच्या प्रचारसभांना राज्यात आजपासून सुरुवात होत आहे. प्रचाराला केवळ १४ दिवसांचा कालावधी असल्यानं प्रभावी प्रचारावर उमेदवारांचा भर दिसून येत आहेत. मानखुर्द-शिवाजीनगर मतदारसंघातले राष्ट्रवादीचे उमेदवार नवाब मलिक आजपासून प्रचाराला सुरुवात करणार आहेत. त्यांच्या विरोधात महायुतीचे उमेदवार सुरेश पाटील निवडणूक लढवत आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी बारामतीत शिर्सुफळ गावात पक्षाचे उमेदवार युगेंद्र पवार यांच्या समर्थनार्थ प्रचार सभा घेतली.

साताऱ्यात कोरेगाव इथं शिवसेनेचे उमेदवार महेश शिंदे यांच्या प्रचारार्थ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची जाहीर सभा झाली. भंडारा विधानसभा मतदार संघातील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे बंडखोर उमेदवार नरेंद्र पहाडे यांनी विविध ठिकाणी पूजा करत प्रचाराला सुरुवात केली. भाजपा नेते, उपमुख्यमंत्री आणि नागपूर दक्षिण पश्चिम मतदारसंघाचे उमेदवार देवेंद्र फडणवीस यांनी आज नागपूर इथं जनसंपर्क रॅली काढून प्रचाराचा प्रारंभ केला.

नागपूर पश्चिम विधानसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे काँग्रेस पक्षाचे उमेदवार विकास ठाकरे हे देखील नागपूर इथं जनआशीर्वाद यात्रा काढून प्रचाराची सुरुवात करत आहेत. सायंकाळी साडेचार वाजल्यापासून ही यात्रा सुरु होईल. नागपूर उत्तर मतदारसंघाचे आमदार डॉ. नितीन राऊत देखील आज शहराच्या विविध भागात प्रचार करत आहेत. आमगाव देवरी विधानसभा क्षेत्राचे महायुतीचे

उमेदवार संजय पुराम यांनी देवरी तालुक्यात हरदोली गावातून प्रचाराला सुरवात केली आहे.

अलिबाग-मुरुड मतदारसंघाचे भाजपचे पदाधिकारी दिलीप भोईर यांचं पक्षातून ६ वर्षासाठी निलंबन करण्यात आलं आहे. महायुतीचे उमेदवार महेंद्र दळवी यांच्याविरुद्ध त्यांनी उमेदवारी अर्ज मागे न घेतल्यानं निलंबनाची कारवाई करण्यात आल्याचं भाजप खासदार धैर्यशील पाटील यांनी सांगितलं.

**<><><><>**

मतदान केंद्रांवरची गर्दी टाळण्यासाठी मतदान केंद्रांची संख्या वाढवण्यात यावी, तसंच मतदारांना विविध सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात, अशी मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षानं राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांच्याकडे केली आहे. पक्षाचे नेते सुभाष देसाई यांनी आज चोक्कलिंगम यांची भेट घेतली आणि विविध मागण्या त्यांच्यासमोर मांडल्या. मतदान यंत्रांच्या बॅटरीवरून सुरू असलेला वाद थांबवण्यासाठी मतदान सुरू करताना आणि बंद होताना मतदान यंत्रांमधल्या बॅटरी किती चार्ज होत्या, याची नोंद ठेवण्यात यावी, अशी मागणीही शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षानं पत्राद्वारे केली आहे.

**<><><><>**

राज्यसभेचा आपला दीड वर्षांचा कार्यकाळ बाकी असून यानंतर पुन्हा राज्यसभेवर जायचं की नाही, याचा विचार करावा लागेल, असं सांगून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी सक्रीय राजकारणातून निवृत्तीचे संकेत दिले आहेत. बारामती विधानसभा मतदारसंघातल्या शिर्सुफळ इथं इथले पक्षाचे विधानसभेचे उमेदवार युगेंद्र पवार यांच्या प्रचारसभेत ते बोलत होते.

राजकारण फक्त निवडणूक आणि सत्तेसाठी नाही, तर लोकांच्या जीवनात बदल घडवण्यासाठी करायचं असतं, असं सांगून या भागात विविध क्षेत्रांमध्ये केलेल्या कामाचा लेखाजोखा त्यांनी मांडला.

<><><><><>

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे आज विदर्भात प्रचार दौऱ्यावर आहेत. यवतमाळ जिल्ह्यातील वणी आणि राळेगाव मतदारसंघातील उमेदवारांसाठी त्यांच्या जाहीर सभा होणार आहेत. राळेगाव इथं चार वाजता मनसेचे उमेदवार अशोक मेश्राम यांच्या प्रचारार्थ जाहीर सभेला राज ठाकरे संबोधित करणार आहेत. त्यानंतर सायंकाळी सहा वाजता मनसेचे वणी इथले उमेदवार राजू उंबरकर यांच्या प्रचारार्थ राज ठाकरे यांची शासकीय मैदानावर जाहीर सभा होणार आहे.

<><><><><>

झारखंड विधानसभा निवडणुकीसाठी उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी आज कोडर्मामध्ये प्रचारसभा घेतली. मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांनी राज्याची अधोगती केल्यानं त्यांचं सरकार उलथून लावण्याची ही योग्य वेळ असल्याचं ते म्हणाले. भाजपाने धर्माच्या नावावर समाजात दुफळी निर्माण केल्याचा दावा मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांनी केला.

<><><><><>

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं 'आढावा विधानसभा मतदारसंघांचा' हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात आज वर्धा आणि नागपूर जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

<><><><>

राज्याच्या पोलीस महासंचालक पदावर आज संजय वर्मा यांची नियुक्ती झाली. ते १९९० च्या तुकडीचे भारतीय पोलीस सेवेचे अधिकारी आहेत. सध्या ते कायदा आणि तंत्रज्ञान विषयक पोलीस महासंचालक म्हणून कार्यरत आहेत. एप्रिल २०२८ मध्ये ते निवृत्त होणार आहेत.

काँग्रेस आणि इतर पक्षांनी केलेल्या तक्रारीनंतर केंद्रीय निवडणूक आयोगानं काल रश्मी शुक्ला यांना पोलीस महासंचालक पदावरून हटवण्याचे आणि त्यांची तात्काळ बदली करण्याचे आदेश दिले होते. तसंच विवेक फणसळकर यांच्याकडे या पदाचा तात्पुरता कार्यभार सोपवला होता.

<><><><>

श्रीक्षेत्र पंढरपूर इथं कार्तिकी एकादशी निमित्त आजपासून श्री विठ्ठलाचं दर्शन भाविकांसाठी २४ तास खुलं राहणार असल्याची माहिती मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली. कार्तिकी यात्रा संपेपर्यंत विठ्ठल मंदिर चोवीस तास भाविकांसाठी खुलं असणार आहे.

<><><><>

अमेरिकी अध्यक्षपदाची होत असलेली निवडणूक तसंच फेडरल रिझर्व्हच्या व्याजदरासंबंधीच्या बैठकीपूर्वी परकीय गुंतवणूकदारांनी घेतलेल्या सावधगिरीच्या धोरणाचा परिणाम भारतीय शेअर बाजारावर दिसून येत आहे. कालप्रमाणेच आजही सकाळापासून घसरणीचं सत्र सुरू होतं मात्र दुपारी या पडझडीचा वेग कमी झाला. सध्या मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स ७९ हजार ४०६ अंकांच्या आसपास व्यवहार करतो आहे तर राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी २४ हजार १९४ अंकांच्या आसपास व्यवहार करतो आहे.

<><><><><>

दिल्लीत भारत ब्रँड आटा आणि भारत ब्रँड तांदूळ वितरणाच्या दुसऱ्या टप्प्याचं उद्घाटन आज ग्राहक व्यवहार, अन्न आणि सार्वजनिक वितरण मंत्री प्रल्हाद जोशी यांच्या हस्ते झालं. भारत ब्रँड आटा ३० रुपये किलो आणि भारत ब्रँड तांदूळ ३४ रुपये किलो दराने उपलब्ध आहे. जीवनावश्यक वस्तूंच्या किमती स्थिर ठेवण्यासाठी आणि शेतकऱ्यांना रास्त भाव मिळावा यासाठी सरकारनं हे पाऊल उचलल्याचं यावेळी ते म्हणाले. या उत्पादनांची खरेदी केंद्रीय भांडार आणि नाफेड इथं करता येईल.

<><><><><>

सर्व प्रकारची खासगी मालमत्ता समाजाची साधनसामुग्री मानून संविधानाच्या कलम ३९ बी अन्वये तिचं फेरवाटप करता येणार नाही, मात्र काही प्रकारची खासगी संपत्ती समाजाच्या हिताकरता अधिग्रहित करता येईल असं सर्वोच्च न्यायालयानं म्हटलं आहे. सरन्यायाधीश न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड यांच्या नेतृत्वाखालच्या ९ न्यायमूर्तींच्या  संविधान पीठानं  आज हा निर्णय दिला. सरन्यायाधीशांसह ६ न्यायाधीशांनी असा निर्णय दिला असून न्यायमूर्ती बी. व्ही. नागरत्ना यांनी अंशतः सहमती दिली आहे, तर न्यायमूर्ती सुधांशु धुलिया यांनी मतभेद नोंदवला आहे.

<><><><><>

पुण्याच्या भारतीय चित्रपट आणि दूरचित्रवाणी संस्थेच्या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या Sunflowers Were the First Ones to Know या लघुपटाला ऑस्कर पुरस्कारांच्या लाइव्ह ॲक्शन शॉर्ट फिल्म या प्रकारात नामांकन मिळालं आहे.

चिदानंद नायक याचं दिग्दर्शन असलेल्या या चित्रपटानं यंदाच्या कान चित्रपट महोत्सवात 'ला सिनेफ' विभागात प्रथम पुरस्कार पटकावला होता.

<><><><><>

उत्तर भारतात मोठ्या प्रमाणात साजऱ्या होणाऱ्या सूर्य नारायणाच्या छट पूजेचं महापर्व आजपासून सुरू होत आहे. मुंबईच्या समुद्र किनाऱ्यांवर छठपूजेसाठी भाविकांनी गर्दी केली आहे. चार दिवस चालणाऱ्या या उत्सवात पहिल्या दिवशी नहाय-खाय या विधीने छठ पूजेला सुरुवात होईल. आज भाविक विविध नद्या, तलाव तसंच जलाशयांमध्ये स्नानविधी करत आहेत. या विधीनंतर ते तांदूळ, हरभरा डाळ आणि भाज्यांचा नैवेद्य दाखवतील. उद्या खरना हा विधी केला जाईल. त्यानंतर पूजेसाठी ३६ तासांचा निर्जळी उपवास केला जाईल. शुक्रवारी ८ नोव्हेंबर रोजी सूर्योदय होताना पूजा करून सूर्याला अर्घ्य अर्पण करत या पूजेची सांगता होईल.